**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**(महाजेनको )**

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**वेबसाईट :- www.mahagenco.in**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती कंपनी) नवीन पारस संच क्र. ३ च्या प्रकरणी बहुवर्षीय वीजदराच्या चौकटीत आर्थिक वर्ष २००८-०९ व २००९-१० करिता वीजदर निश्चितीकरणासाठी केलेल्या याचिकेवर हरकती /सूचना/अभिप्राय मागवण्याकरिता.**

**(म.वि.नि.आयोग प्र.क्र.९५/२००८)**

१. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती कंपनी) नवीन पारस संच क्र. ३ करिता बहुवर्षीय वीजदराच्या चौकटीत आर्थिक वर्ष २००८-०९ व २००९-१० करिता वीजदर निश्चितीकरणास मंजूरी मिळविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ यातील तरतुदी आणि आयोगाचे (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ याखाली याचिका सादर केलेली आहे. मा. आयोगाने सदर विनंती अर्ज दिनांक २८.०१.२००९ ला दाखल करुन घेतली आहे आणि अधिनिमनाचे कलम ६४(२) या खाली महानिर्मिती कंपनीने जाहिर सूचना प्रसिध्द करावी, असे निदेश दिले आहेत.

२. याचिकेतील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

**तक्ता - १**

**पारस संच क्र. ३ : प्रकल्पाची पूर्ण किंमत** **(रु.कोटीत )**

| अनु क्र. | तपशिल | प्रकल्पाची मुळ किंमत | प्रकल्पाची पुर्ण किंमत | तफावत | तफावतीची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | पारस संच क्र.३ | • केंद्रिय विद्युत प्राधिकरणाने मान्यता दिलेली किंमत रू. १०२६.७० कोटी<br>• यंत्रसामुग्रीच्या ऑर्डरवर आधारीतमंडळापूढे सादर केलेली अदांजे अंतिम किंमत रू. १४६८.०४ कोटी | रूपये १४३९.३२ कोटी * | रूपये ४१२.६२ कोटी | • ऑर्डर करते वेळी विविध उपकरणाच्या किंमतीत प्रमाणाबाहेर झालेली वाढ.<br>• मेसर्स बी.एच.ई.एल. कडून क्रमवार यंत्र सामग्रीचा पुरवठा होण्यात विलंब. |

* पारस संच क्र.४ व पारस संच क्र.३ यामधील सामूहिक सुविधा यांची किंमत आणि मे. भेल यांच्यावर लागू केलेली नुकसान भरपाई (लिक्वीडेटेड डॅमेजेश) वगळून

**तक्ता -२**

**पारस संच क्र. ३: करिता एकूण वार्षिक महसुलाची गरज**

**(रु.कोटीत )**

| अनु क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २००८-०९ | आर्थिक वर्ष २००९-१० |
|---|---|---|---|
| १. | इंधन संबधित खर्च | २०४.२४ | २२८.७९ |
| २. | संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ३१.२४ | ३२.९२ |
| ३. | घसारा | ५१.६१ | ५१.९६ |
| ४. | घसा-यासाठीच्या अग्रीमासहित | ५१.६९ | ५१.३५ |
| ५. | दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १२१.७१ | ११२.६५ |
| ६. | खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.८१ | १७.५२ |
| ७. | आयकर | ५.५२ | ५.५२ |
| ८. | एकूण महसुली खर्च | ४८२.८२ | ५००.७२ |
| ९. | अधिक (+) भाग भांडवलावरील परतावा | ४८.७६ | ४८.७६ |
| १०. | वजा (-) इतर उत्पन्न | .--- | --- |
| ११. | एकूण महसुलाची आवश्यकता | ५३१.५८ | ५४९.४८ |

**तक्ता -३**

**पारस संच क्र. ३: संचालन विषयक मापदंडाची आर्थिक वर्ष २००८-०९ व २००९-१० करिता मार्गदर्शिका**

| अनु क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २००७-०८ | आर्थिक वर्ष २००८-०९ | | आर्थिक वर्ष २००९-१० |
|---|---|---|---|---|---|
| | | प्री सिओडी | स्थिरीकरण | स्थिरीकरणा नंतर | |
| १ | स्थिरीकरण कालावधी (दिवस) | -- | २७५ | ९० | -- |
| २. | उपलब्धता (%) | २६.३४% | ३९.३५% | ८०% | ८०% |
| ३. | सयंत्र भार अंक(%) | २६.३४% | ३९.३५% | ८०% | ८०% |
| ४. | दुय्यम इंधनाचा वापर (मिली/कि वॉ तास) | ६७.६० | ३१.९५ | २.०० | २.०० |
| ५. | वहनातील हानी (%) | ०.४९ | ०.८० | ०.८० | ०.८० |

**तक्ता -४**

**पारस संच क्र. ३: वीजनिर्मितीचा स्थिर खर्च आणि चल परिव्यय**

| आर्थिक वर्ष २००७-०८ | | | आर्थिक वर्ष २००८-०९ | | | | | | | | | आर्थिक वर्ष २००९-१० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्री सिओडी | | | पोस्ट सिओडी (स्थिरीकरण) | | | अंदाजित | | | स्थिरीकरणानंतर | | | संकल्पित | | |
| स्थिर खर्च | चल परिव्यय | बेरीज | स्थिर खर्च | चल परिव्यय | बेरीज | स्थिर खर्च | चल परिव्यय | बेरीज | स्थिर खर्च | चल परिव्यय | बेरीज | स्थिर खर्च | चल परिव्यय | बेरीज |
| -- | ३.४१ | -- | -- | २.६२ | -- | -- | १.४० | -- | ३.४० | २.१२ | ५.५२ | २.०१ | १.४४ | ३.४५ |

**तक्ता -५**

**पारस संच क्र. ३: निव्वळ वीजनिर्मिती (द.ल.युनिट)**

| आर्थिक वर्ष २००७-०८ | | आर्थिक वर्ष २००८-०९ | | आर्थिक वर्ष २००९-१० |
|---|---|---|---|---|
| आयोगाचा पुनर्विलोकन आदेश | प्रत्यक्ष | आयोगाचा पुनर्विलोकन आदेश | अंदाजित | संकल्पित |
| २३४ | २२०.४२ | १५९२ | ९६३.५७ | १५९४.३२ |

३. खालील दस्तऐवजांच्या प्रती महानिर्मिती कंपनींच्या खाली नमुद केलेल्या कार्यालयांत आणि इतर कार्यालयांमध्ये लेखी विनंती केली असता मिळू शकतील.

क) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश (इंग्रजी किंवा मराठी भाषेत), विनामूल्य.

ख) इंग्रजी भाषेतील सीडीसहित तपशीलवार विनंती अर्जाचे दस्तऐवज : रु १५०/- रोखीने अथवा महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कं.लि.यांच्या नावाने मुंबई येथे देय होणाऱ्या दर्शनी धनाकर्ष/धनादेश यांद्वारें प्रदान केल्यास.

ग) तपशीलवार विनंतीअर्जाचे इंग्रजी भाषेतील दस्तऐवज : रु. १००/-

घ) तपशीलवार विनंती अर्जाची: इंग्रजी भाषेतील सीडी रु. ५०/-

मुख्य कार्यालय : अधिक्षक अभियंता, (निर्मिती),
नियामक कक्ष,
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
तिसरा मजला, प्रकाशगड,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
इ-मेल : **rcgen@mahagenco.in**

**अन्य ठिकाणची कार्यालये :**

**१. मुख्य महाव्यवस्थापक, वायु विद्युत केंद्र, उरण**
**२. मुख्य महाव्यवस्थापक, महाऔष्णिक विद्युत केंद्र, दुर्गापुर, चंद्रपुर**
**३. मुख्य महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी, नागपुर**
**४. मुख्य महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा, नागपुर**
**५. मुख्य महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, परळी वैजनाथ, बीड**
**६. मुख्य महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर, भुसावळ**
**७. मुख्य महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे, नाशिक**
**८. मुख्य महाव्यवस्थापक, चाचणी उपकरणयोजना व नियंत्रण, नागपुर**
**९. महाव्यवस्थापक, औष्णिक विद्युत केंद्र, पारस, अकोला**
**१०. अधिक्षक अभियंता, (निर्मिती), लघुजलविद्युत मंडल, पुणे**

४. महानिर्मिती कंपनीने या जाहीर सूचनेद्वारे उक्त याचिकेसंबंधात जनतेकडून हरकती /सूचना/अभिप्राय मागवाव्यात, असे मा. आयोगाचे निदेश आहेत. जनतेने आपल्या हरकती /सूचना/अभिप्राय यांच्या चार प्रती (त्याखेरीज एक प्रत याचिकाकर्ता म्हणजे, महानिर्मिती कंपनी यांना पाठविल्याच्या पुराव्यासहित) माननीय सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, तेरावा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ (फॅक्स क्र. २२१६३९७६ इ-मेल : mercindia@mercindia.org.in या पत्यावर दिनांक : २३.०२.२००९ पर्यत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात.

५. हरकती /सूचना/ किंवा अभिप्राय दाखल करु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने इंग्रजी किंवा मराठी भाषेतील चार प्रती, त्यांवर प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व असल्यास इ-मेल पत्ता

यांसहित दिनांक : २३.०२.२००९ पर्यत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात. एखाद्या ग्राहक संघटनेच्या वतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. प्रेषकास आयोगापुढील जाहीर सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास तेही नमूद करावे. अशा व्यक्तीस आयोगाकडून आयोगाचे कार्यालय **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, तेरावा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ शुक्रवार दि. ०६ मार्च २००९ सकाळी ११.०० वाजता** या ठिकाणी करण्यात येणाऱ्या सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्याकरिता निराळी सूचना दिली जाणार नाही.

६. दिनांक २३.०२.२००९ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती/ सूचना/अभिप्राय यांना महानिर्मिती कंपनीकडून तीन दिवसांत परंतु ०२.०३.२००९ पूर्वी उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर आक्षेपक त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा दिनांक ०२.०३.२००९ पर्यंत दाखल करु शकतात.

७. तपशीलवार विनंतीअर्जाचे दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश महानिर्मिती कंपनीच्या वेबसाईटवर www.mahagenco.in उपलब्ध आहे, तसेच कार्यकारी सारांश आयोगाच्या वेबसाईटवर http://www.mercindia.org.in डाऊनलोड करुन घेण्यासाठी विनामूल्य उपलब्ध आहे.

मधुकर शेलार
**संचालक (संचलन)**
**महानिर्मिती कं. म.**

**दिनांक : ०२.०२.२००९**

**मुंबई**